उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

**पत्र २, महिना – जानेवारी २०१७**

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

उन्नती संस्थेद्वारा प्रकाशित -

# बिडे वार्तापत्र

---

## शिक्षणाने समज दिली

मी संस्थेच्या युवा संमेलनाची कार्यक्रमपत्रिका देण्यासाठी गावांमध्ये जात होतो, गावातील युवक, युवती आणि लोकप्रतिनिधी यांच्या भेटी घेत होतो. अकोट तालुक्यातील एका गावात गेलो असताना एक गावकरी भेटले, त्याच्याशी बोलत होतो, तर त्यांनी सांगितले की, महिला सरपंचाना भेटून घ्या. म्हणून मी त्यांच्या घरी गेलो, तर घरात एक दोन महिला होत्या. मी त्यांना परिचय करून देताना, मला समजले की घरी एकही पुरुष व्यक्ती नव्हता. मला वाटले की कामाचे बोलायला आता नंतर यावे लागेल. पण श्रीमती अपर्णा किसन मावसे या सरपंचताई बाहेर आल्या, गावाविषयी बोलत होत्या, एव्हाना अनुभव असा सांगतो, की नवरा असल्याशिवाय महिला कोणत्या पदावर असल्या तरी बोलत नाहीत , त्यावर की काय बाहेर सुद्धा येत नाही. तर त्यांच्या ऐवजी त्यांचे नवरे किंवा इतर कुणी पुरुष माणूस बोलतात. पण येथे परिस्थिती वेगळी होती. आदिवासी गावातील एक आदिवासी महिला इतक्या चांगल्या प्रकारे कामाची जाण असल्यासारखे बोलत होत्या. मग मी त्यांना विचारले की, “महिला सहसा बोलत नाही, समोर येत नाही, तुम्ही तर ....”. त्या म्हणाल्या, “आमच्या घरात सर्वजण किमान १० वी १२ वी पर्यंत शिकलेले आहेत, त्यामुळे समज आहे, म्हणून मी आज तुमच्या शी बोलत आहे. घरात काहीही काम असेल तर चर्चा होते, म्हणून हे मला काही विशेष नाही. **खरं सांगायचं झालं तर हे बळ आम्हाला शिक्षणानेच दिले आहे.”** - शरद सूर्यवंशी (उन्नती संस्थेत पूर्णवेळ कार्यकर्ता)

---

## पर्याय नव्हता

मुलाचे लहानपणचे दिवस किती आनंदाचे असतात, आई वडिलांना खुणावतात, कुठल्याही पालकांना, गावात शिक्षणाची सोय असल्यावर आपली मुले दुसऱ्या ठिकाणी शिकायला पाठविणे आवडणार नाही . पण गावात शिक्षणाची सोय असली तरी दर्जेदार नाही, पालकांचे समाधान करू शकेल, मुलांना चांगलं शिकवू शकेल अशी नाही असे संतोष ठोंबरे यांना वाटते, म्हणून त्यांनी त्यांच्या विशाल नावाच्या मुलाला मागील वर्षी अंगणवाडीपासून (तालुक्यातीलच एका गावात) शिकण्यास ठेवले आहे. तिथे तो त्यांच्या नातेवाईकांकडे राहतो. विशाल या वर्षी इयत्ता पहिलीच्या वर्गात आहे. मी त्यांना विचारले - “मागच्या वर्षापासून का टाकलं? तुम्हाला या वर्षी टाकता आलं असते की.” त्यावर त्याचं म्हणणं होतं की, “मुलांच्या शिक्षणाचा पाया हा अंगणवाडी पासून सुरु होतो. गावातील अंगणवाडी तर रोज उघडते, मदतनीस येते आणि खिचडी वाटप करून निघून जाते. सेविका कधीतरी मनाला वाटेल तेव्हा येते. गावातील अंगणवाडी आणि शाळा दोन्ही व्यवस्था चांगल्या काम करीत नाही. **‘म्हणून मुलाच्या भविष्याचा विचार करून हा निर्णय घेतला. माझ्याकडे दुसरा पर्याय नव्हता.”** (कथेतील नावे बदलली आहेत)

*गावातील प्रत्येक बालकाला आहार मिळावा , शिक्षण मिळावे यासाठी शासनाने प्रत्येक गावात अंगणवाडी आणि शाळा या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत . पण या व्यवस्थांवरील गावकऱ्यांचा विश्वास उडणे हे चांगले लक्षण नाही . या व्यवस्था जर काम करत नसतील तर **शाळा व्य. समिती, सरपंच, पालक गावकरी यांनी जातीने लक्ष घालून या व्यवस्थांवर लक्ष ठेवण्याची आणि त्या सक्षम करण्याची गरज आहे.** तसे झाले तर सर्व बालकांना चांगल्या सेवा मिळतील व कुठल्याही बालकाला आपले घर सोडून बाहेरगावी राहण्याची वेळ येणार नाही.*

## आदिवासी भागातील चांगल्या शाळा व शिक्षकांचा सत्कार -

संस्थेचे कार्यकर्ते आदिवासी क्षेत्रातील गावांमधील शाळा व्य. समिती सदस्य तसेच गावकरी यांच्यासोबत भेटीगाठी घेत असतात. या दरम्यान काही गावच्या गावकऱ्यांनी आपापल्या शाळेचे / शिक्षकांचे आदराने नाव घेतले. “आमच्या मुलांना ते शिकवतात” असे कौतुकाने सांगितले. हे कौतुक त्या शाळा व शिक्षकांपर्यंत पोहोचणे आम्हाला गरजेचे वाटले. काही गावांचा उल्लेख गेल्या महिन्याच्या वार्तापत्रात आला आहे. उर्वरित अकोट तालुक्यातील शिक्षक व शाळा पुढीलप्रमाणे:

**जि. प. शाळा जनुना**

१. आमची शाळा छान आहे २. आमच्या शाळेतील सर्व शिक्षक मुलांना चांगलं शिकवतात ३. आमचे सर्व शिक्षक शिकवतांना साहित्याचा वापर करतात ४. आमची परिसरातील सर्वात चांगली शाळा आहे ५. आमच्या गावात एकही शाळाबाह्य मूल नाही ६. आमच्या शाळेत बाहेरगावातील मुलं सुद्धा शिकायला येतात.

**जि. प. शाळा कुंड**

१. आमची शाळा सुंदर आहे २. शिक्षक मुलांना चांगलं शिकवतात ३. शिक्षक अनियमित मुलांच्या घरी भेटी देतात ४. शाळेत काही गरज असल्यास, शाळा समिती सोबत चर्चा करतात ५. मुलांच्या उपस्थितीविषयी शिक्षक नेहमी सजग असतात.

**जि. प. शाळा बोरी**

शाळेविषयी, १. आमच्या शाळेतील सर्व मुलांना लिहिता वाचता येतं २. शिक्षक मुलांना चांगलं शिकवतात ३. शिक्षक पालकांच्या संपर्कात असतात ४. गावातील लोक गावाच्या शैक्षणिक परिस्थितीविषयी समाधानी आहेत.

**जि. प. शाळा मार्डी**

शाळेविषयी, १. शिक्षक मुलांना चांगलं शिकवतात २. शिक्षक अनियमित मुलांच्या घरी भेटी देतात ३. मुलांच्या उपस्थितीविषयी नेहमी सजग असतात.

**जि. प. शाळा रुधाडी**

शाळेचे मुख्याध्यापक श्री. मंगेश शिवलिंगअप्पा दसोडे यांच्याविषयी, १. आपण मुलांना चांगलं शिकवता २. आपण मुलांना शिकवतांना साहित्याचा वापर करता ३. आपला पालकांशी नेहमी संपर्क असतो ४. शाळेच्या कामात आपण पालकांचा सहभाग आवर्जून घेता ५. एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही, यासाठी आपण लक्ष ठेवता ६. सर्व मुलांना लिहिता वाचता येईल, याकरिता आपण नेहमी प्रयत्नशील असता.

**जि. प. शाळा कोहा - सहाय्यक शिक्षक श्री. संदीप दामोदर जाधव** यांच्याविषयी - १. आपण मुलांना चांगलं शिकवता २. आपण शाळेवर वेळेवर येतं व जाता.

**जि. प. शाळा चीचपानी - सहाय्यक शिक्षक श्री. प्रवीण दुर्योधन रेखाते** यांच्याविषयी - १. आपण मुलांना चांगलं शिकवता २. आपण शाळेत नियमित वेळेवर येता व जाता.

**जि. प. शाळा डांगरखेड - सहाय्यक शिक्षक श्री. संजय नारायणराव पेडेकर** यांच्याविषयी - १. आपण मुलांना चांगलं शिकवता २. आपण इंग्रजी हा विषय चांगला शिकवल्याने मुलांना इंग्रजी वाचता येत ३. आपण पालकांच्या नेहमी संपर्कात असता.

## शाळा व्यवस्थापन समितीने घेतलेला निर्णय



### कापडणेच्या शाळांमध्ये बसविणार ‘मोबाईल जॅमर’

**कापडणे (जि. धुळे), ता. २८ :** मोबाईल असणे किंवा वापरणे आजची गरज झाली असली तरी त्याच्या अतिरेकी वापरामुळे आता शिक्षकां 'मोबाईल नको' असे सांगण्याची वेळ कापडणेच्या ग्रामस्थांवर आली शिक्षकांकडून मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांच्या गुणवत्तेवर परिणाम असल्याचे सांगून ग्रामपंचायतीमार्फत या शाळांमध्ये मोबाईल जॅमर बसविण्या निर्णय घेण्यात आला. कापडणेत १५ अंगणवाड्या व जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. शाळेत शिक्षक सतत मोबाईलवरच असतात असे मुलांनी सांगितल्याने त्यातून निर्माण झालेल्या असंतोषावर ग्रामसभेत चर्चा जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक शिकविण्यापेक्षा मोबाईलवरच जास्त असतात, त्यामुळे वर्गात शिकविले जात नाही अशा विविध तक्रारी आल्या. त्यामुळे शाळांमध्ये मोबाईल जॅमर बसविण्याचा व चौदाव्या आयोगातून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला.

ही समिती सक्षम दिसतेय. चौदाव्या वित्त आयोगाचा निधी कुठे वापरता येईल याचेही त्यांना चांगलेच ज्ञान आहे.

*समाप्त*